ISSN: 2454-5503
VOL. 7 | ISSUE 1 | FEBRUARY 2021
IMPACT FACTOR : 4.197 (IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

*Special Issue on*

## GENDER EQUITY IN HIGHER EDUCATION

(Book III)



***Chief Editor***

**Dr. R. S. Funne**

*(Principal)*

***Issue Editors***

**Dr.J.M.Bochare | Dr.M.U.Khedekar**

IMPACT FACTOR:4.197(IIJIF) ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 7 SPECIAL ISSUE 3 FEBRUARY 2021

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue on

# GENDER EQUITY IN HIGHER EDUCATION

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

*Chief Editor*

**Dr. R. S. Funne**
*(Principal)*

*Editors*

**Dr. J. M. Bochare**
**Dr. M.U. Khedekar**

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*
**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W).**

१५. उद्योग क्षेत्रातील यशस्वी महिला उद्योजक
**डॉ. जि.एन. सोनटक्के / डॉ. बी.एस. पवार** | ७७
१६. ग्रामीण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील लिंगभाव दृष्टिकोण ...
**डॉ. श्वेता बा. चौधारे** | ८०
१७. जागतिक स्तरावरील स्त्रीवाद : ऐतिहासिक आढावा
**डॉ व्यास सी. पी.** | ८७
१८. नोकरीच्या ठिकाणी होणारे महिलांचे लैंगिक शोषण
**डॉ.अंभुरे एस. डी.** | ९३
१९. पंचायतराज व्यवस्थेत महिला नेतृत्वाचा सहभाग
**कु. ज्योती बालासाहेब हारकाळ** | ९७
२०. ७३व्या घटनादुरुस्तीच्या परीप्रेक्षातून महिला सशक्तीकरण एक शोध
**इब्राहीम जमन तडवी** | १०२
२१. भारतामधील यशस्वी महिला उद्योजकाचे गुण व कार्य ...
**डॉ. बालासाहेब शिवाजी पवार** | १०६
२२. भारतीय राजकारण आणि महिला
**डॉ. लांडगे पी.एस.** | १११
२३. भारतीय साहित्य आणि महिला सबलीकरण
**शैला जगदंबे** | ११७
२४. महिला सक्षमीकरणाची संकल्पना : योजना व उपाय
**डॉ. बडुरे राजू सायन्ना** | १२४
२५. महिला सक्षमीकरणात कायद्याचे योगदान
**डॉ. तुकाराम रामराव फिसफिसे** | १२९
२६. महिला सक्षमीकरणात सामाजिक माध्यमांची भूमिका : एक ...
**डॉ. ज्योती पोटे** | १३३
२७. महिला सबलीकरण आणि महिला उद्योजक
**डॉ.मारोती धोडींबा कच्छवे** | १४२
२८. महिला सबलीकरण आणि ऐतिहासिक दृष्टीकोण
**जोगदंड मयुरी रमेश** | १५०

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

27

# महिला सबलीकरण आणि महिला उद्योजक

**डॉ.मारोती धोडींबा कच्छवे**

वाणिज्य विभाग प्रमुख, प्रपाठक व संशोधन मार्गदर्शक

कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी ४३१५१६

प्रस्तावना :- भारतीय बहुसंख्य स्त्रिाया या घरकामात गुंतलेल्या असतात. कमी उत्पादकतेची व कमी कौशल्याची कामे स्त्रीयाकडे दिली जातात म्हणून स्त्रिायांना आर्थिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते. महिलांचे अर्थिक दृव्या सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला या उपजीविकेसाठी शेती, मजुरी, उद्योग, दुग्ध व्यवसाय इत्यादी क्षेत्रात काम करत असतात. परंतु त्यांच्या कामाची कधीही मोजमाप केले जात नाही त्यामुळे आर्थिक सबलीकरणाला चालना मिळत नाही. कायदे व कल्याण कार्यक्रमाचा माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रामध्ये महिलांना पुरूषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे. विकासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री-पुरूष असमानता नष्ट करणे या प्रकियेला स्त्री सक्ष्मीकरण असे म्हणतात.

मानव समुहात स्त्रीजातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. मानवी हक्कासंबंधी अनेक आंतरराष्ट्रीय करारांत मान्यता मिळूनही स्त्रिाया निर्धन आणि निरक्षर राहण्याचे प्रमाण मोठे आहे.

भारतीय राज्यघटनेने बहाल केलेला समानतेचा मुलभूत हक्क हा महिलांच्या विकासाचा भक्कम पाया आहे. सहाव्या पंचवार्षीक योजने अंतर्गत महिलासंबधीच्या तरतुदीमुळे बदलाची प्रक्रिया गतीमान झाली. १९९० मध्ये 'राष्ट्रीय महिला आयोग' ची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रात जानेवारी १९९३ मध्ये या आयोगाची स्थापना केली. समाजाचा दुर्बल घटकांच्या मुलभूत गरजांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'महिला व बालविकास' हा स्वतंत्र विभाग जून १९९३ मध्ये स्थापन केला. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने दि.२४ फेब्रुवारी, १९७५ रोजी महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. महिलांच्या सर्वांगिण

विकासाचे महत्त्व व महामंडळाची या क्षेत्रातील तज्ञता व कौशल्य लक्षात घेवून महाराष्ट्र शासनाने २० जानेवारी, २००३ रोजी महामंडळाला महिला विकासाची राज्यस्तरीय शिखरसंस्था म्हणून घोषीत केले. या महामंडळाच्या अखंड विकास प्रक्रियेतून महिलासाठी सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय प्रस्थापित करण्याचा हेतू काही प्रमाणात साध्य झाल्याने दिसून येते.

भारत सरकारने २००१ हे वर्ष 'महिला सबलीकरण वर्ष' म्हणून जाहीर केले. त्या निमित्याने महिलांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतला. तत्कालीन प्रधांनमंञ्यांनी टस्त्री शक्ती पुरस्कार सुरू केला'. तसेच महिला व बालविकास विभागाअंतर्गत महिला विकासांच्या विविध योजना आखण्यात येत असून सर्व नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था व शासन, महिला सबलीकरणासाठी सर्व स्तरांवरील वार्षिक व पंचवार्षिक योजनांची आखणी करताना दिसतात. विविध स्तरावरील महिला व बालविकास समित्यांकडून या योजनांचा समन्वय साधण्यात येतो. महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनामुळे महिलांचे सर्वांगाने सबलीकरण होताना दिसून येते. महिलांच्या अर्थिक, सामाजिक व राजकीय सबलीकरणामध्ये महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचे योगदान अंत्यत महात्वाचे आहे.

**संशोधनाचे उद्देश:-** सदरील संशोधनाची खालील उदेश निश्चित केली आहेत.

१. उद्योजकतेची उत्कांती व विकास शोधणे.
२. महिला सबलीकरण व महिला उद्योजकतेचा अभ्यास करणे.
३. महिला उद्योजकता वाढविण्यासाठी जाबाबदार घटक शोधणे.
४. महिला उद्योजकांच्या मार्गतील अडथळे शोधणे.

**संशोधनाची गृहितके:-**

१. देशात महिला उद्योजकांची संख्या दिवसेदिवस वाढत आहे.
२. महिला अनेक समस्यावर मात करत आपल्या व्यवसायात कार्यशील असतात.

**अभ्यास पध्दती:-** सदर शोध प्रबंधासाठी दुय्यम सामुग्रीचा आधार घेतला असून दुय्यम सामग्रीत संदर्भ ग्रंथ, दैनदिन वर्तमान पत्रातील लेख मासिके, इंटरनेट इ.आधार घेतलेला आहे. वरील उदिष्टे डोळयासमोर ठेवून सामुग्री संकलन केले आहे.



Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani



**अद्योजकतेची उत्क्रांती व विकासः-** ऋग्वेदाच्या काळात समाजात धातूच्या वस्तूंचे उत्पादन करणारे हस्ताद्योग प्रचलित होते. मानवी संस्कृतीच्या सुरूवातीच्या अवस्थेतही भारतात उच्य प्रतीचे कौशल्य व क्षमता असलेले कारागीर होते. त्यांनी उत्पादन केलेल्या विविध वस्तू एका बाजूने नवाबाच्या, राज्याच्या व श्रीमंताच्या महालाची व हवल्यांची शोभा वाढवित होत्या. तसेच नागरिकही वस्तू वापरत होते. वाहतुकीची व दळणवळयाची सोय नसल्यामुळे कारागीर गावातच उत्पादित केलेल्या वस्तू विकत असत. त्यामुळे कारगीरापुढे विक्रीची समस्या नव्हती. औद्योगिक क्रांती पूर्वी भारत एक प्रगत राष्ट्र समजले जात होते. काश्मीरी शालू, अहमदाबादी धोती, वाराणसीची तांब्या पितळाची भांडी जगभर प्रसिध्द होती. परंतु पायाभूत सोयीचा अभाव, राजाश्रय नसणे, उद्योजकांना अर्थिक पाठींबा नव्हता. राजकीय अस्थिरता, जबर कर आकारणी इत्यादी कारणामुळे भारतात उद्योजकतेच्या विकासाची गती मंद होत गेली. मुंबई-अमहदाबादच्या परिसरात सूती कापड गिरण्यांची, कलकत्याच्या असपास ज्युटच्या गिरण्यांची स्थापना करण्यात आली. त्यांनतर कोळसा, कागद कारखाणे इत्यादी उद्योग सुरू झाले.

**महिला सबलीकरणः-**महत्वाचे निर्णय घेताना तिचे मत विचारात घेणे म्हणजे महिला सबलीकरण होय. स्वतःचे निर्णय स्वतःघेण्याचं स्वातंत्र्य म्हणजे महिला सबलीकरण होय.

जगातील प्रत्येक देशात समाज व राष्ट्राच्या विकासातील एक महत्वाचा घटक म्हणजे महिला होय. महिला सक्षमीकरण ही संकल्पना एक प्रक्रिया आणि चळवळ म्हणून ओळखली जाते. स्त्रियांच्या शारीरिक मानसिक आणि भावनिक जीवनाची गुणवता सुधारून त्यांच्यावरील अन्याय व अत्याच्यार दूर करणे. तसेच त्यांचे खच्चीकरण थाबंवून त्यांच्या मानसिक आणि बौध्दीक विकास घडवून त्यांना उपेक्षित ठेवणा-या व्यक्तीचे मत परिर्वतन घडवून हा महिला सबलीकरणाचा मुळ हेतू आहे. महिलांना पुरूषाबरोबर संधी, दर्जा आणि प्रविष्ठा मिळवून देणारी ही चळवळ आहे. पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये ऐतिहासिक काळापासून स्त्रीला पध्दतशीरपणे उपेक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला गेला आहे. मध्ययुगीन कालखंडात सतीप्रथा, स्त्री जीवन हे पुरूषावर अवलंबून होते. ब्रिटीश राजवटीच्या काळात स्त्रियांच्या सुधारणेची मुहुर्तवेढ रोवली होती. स्त्रियांसाठी विविध कायदे, सर्वांसाठी खुले शिक्षण चालू करून

स्त्री सबलीकरणाला चालना दिली. पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्रीला दुय्यम स्थान दिले आहे. पुरूषाने तिला सहचारीणी, अर्धांगिणी समजण्याऐवजी तिला घरगुती, उपभोग्य वस्तू बनवून टाकले आहे. एकंदरीत स्त्रीवर अनेक प्रकारची बंधने लादल्यामुळे ती अबला बनली ती सक्षम झाली नाही. देशाला महिला सबलीकरणाशिवाय उज्जवल भविष्य असू शकत नाही. महिलांनी सर्वच क्षेत्रातील नवनवीन अव्हाने पेलण्यासाठी उद्योजकता स्वीकारली पाहिजे. ''महत्वाचे निर्णय घेताना तिचे मत विचारात घेणे म्हणजे महिला सबलीकरण' होय. स्वः घेण्याचे स्वातंत्र्य म्हणजे महिला सबलीकरण होय.''

महिला उद्योजकता - प्रत्येक देशाच्या 'आर्थिक विकास' हा देशातील उद्योजकतेवर अवलंबून असतो. उद्योजकीय क्षेत्रावर महिलाही आपली पकड हळूहळू मजबूत करत आहेत. उद्योजकांची भूमिका पार पाडण्यास त्या सज्ज झाल्या आहेत. भारताच्या लोकसंख्येत ५० ऽ च्या आसपास महिलांचे प्रमाण दिसून येते. म्हणून केवळ पुरुषांनी उद्योजकतेवर ताबा मिळून आर्थिक विकास होऊ शकणार नाही तर महिलांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून उद्योजकीय विकास घडवून बरोबरीने अर्थार्जन करून आर्थिक विकासात सहभागी होणे आता काळाची गरज बनली आहे. देशाच्या आर्थिक बाजूचा विचार केला असता निर्देशानास येते की, देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनातील महिलांचा हिस्सा अत्यल्प आहे. त्यासाठी महिलांचा दोष नसून या देशातील पुरुष प्रधान अर्थव्यवस्था कारणीभूत आहे. देशाची एकूण आर्थिक बाजू सक्षम करण्यासाठी महिलांनी उत्पादनाच्या कार्यात सक्रिय करणे अनिवार्य झाले आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत आर्थिक जीवनात विशिष्ट प्रकारचे बदल घडवून आणणाऱ्या प्रक्रियेला आर्थिक विकास असे म्हणतात. आर्थिक विकास आधुनिक मानवाची मूलभूत प्रेरणा मानली जाते.

उद्योजकता (Entrepreneruship) ही एक अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. या संकल्पनेची उत्पत्ती सोळाव्या शतकात फ्रान्समध्ये झाली. 'उद्योजकता' हा शब्द फ्रेंच भाषेतील ज्यामूळ शब्दापासून विकसित झाला त्याचा अर्थ अंगीकृत करणे, स्वीकारणे, शोधणे, बदलणे असा होतो. महिला उद्योजकता ही एक अशी प्रक्रिया आहे की, जेथे महिला उद्योगांचे व व्यवसाययांचे नेतृत्व व व्यवस्थापन करतात. आणि इतरांना रोजगार पुरवितात. स्त्रीचे व्यक्तिमत्व उद्योगजगताकडे झुकणारे आहे. उद्योग करणाऱ्या व्यक्तीला उद्योजक म्हटले जाते. उद्योजकता ही एक प्रवृत्ती आहे.



Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth, Dist. Parbhani

यशस्वी उद्योजक होण्यासाठी काही विशिष्ट गुण कौशल्य उद्योजकाकडे असावे लागतात. सुदैवाने ही गुणकौशल्य स्त्रियांमध्ये उपजतच असतात. कठोर परिश्रम करण्याची तयारी, बचतीची सवय, लोकांकडून काम करून घेण्याचे कौशल्य, कमीत कमी खर्चात घर चालविण्याचे कौशल्य, विक्री कौशल्य, कमी पैशात उत्तम वस्तू खरेदी करण्याचे कौशल्य, घासाघीस करून किंमत कमी करण्याचे कौशल्य, नेतृत्व, उत्तम संवाद कौशल्य इत्यादी फक्त महिलांना थोडीशी प्रेरणा देण्याची संधी देण्याची गरज असते. यांच्या जोडीला त्यांना योग्य प्रशिक्षण मिळाले तर महिला उद्योग क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावू शकतात.

उद्योजक म्हणजे धाडस करणारी, सहासी, धोका पत्करणारी व्यक्ती हा अर्थ अठराव्या शतकापासून रूढ झाला आहे. हळूहळू ते व्यवसायिक महिला म्हणून आपली ओळख निर्माण करीत आहेत. आणि पुरुष पैशांना त्याच्या पैशासाठी धाव देतात. महिला उद्योजक उल्लेखनीय यश संपादन करीत आहेत. लघुउद्योगांच्या एकूण संस्थेच्या संबंधात त्यांची संख्या अद्याप खूपच कमी आहे.

आधुनिक काळात महिला उद्योजक व्यवसाय, व्यापार किंवा उद्योगात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. राजकारण, प्रशासन, वैद्यकीय व अभियांत्रिकी, तांत्रिक सामाजिक व शैक्षणिक सेवा यासारख्या इतर क्षेत्रात महिलांनी यापूर्वीही आपली महत्त्वपूर्ण भूमिका दर्शवली आहे. उद्योजक महिलांमध्ये कठोर परिश्रम करण्याची क्षमता असते.

हे जग गतिशील आहे आणि ते वेगाने बदलत आहे. सामाजिक परिवर्तन, उच्च शिक्षणाचा प्रसार, महिला कायदे, जागृती करणे, नागरीकरण, कौटुंबिक आधार इत्यादींमुळे महिला उद्योजक मोठ्या संख्येने मोलाचे योगदान देतात महिला फक्त त्यांच्या अस्तित्वासाठी व्यवसाय कार्यातच गुंतलेल्या नसतात. ते त्यांच्या सर्जनशीलता आणि कौशल्याचे अंतर्गत इच्छा पूर्ण करू इच्छित आहेत. या उद्देशाने त्या रणनीती आखत आहेत. शिक्षण, राजकारण, स्वंरोजगार, व्यवसाय इ. मधील त्यांची संख्या मोठ्या वेगाने वाढत आहे. महिला परिवर्तन हे सामाजिक परिवर्तनाचे कारण आहे. महिला मोठ्या प्रमाणात व्यावसायिक शिक्षण घेत आहेत आणि विविध क्षेत्रातील भरभराट होत आहे. भारतीय महिला जलद उद्योजक बनत आहेत आणि विविध आर्थिक उपक्रम राबवित आहेत. महिला उद्योजक नवीन उद्योग सुरू होण्याच्या शक्यतेच्या शोध घेतात. ते जोखीम गृहीत करण्यास, नवकल्पनांचा परिचय देण्यास, त्यांच्या कौशल्यामुळे आणि ज्ञानाने प्रशासन व

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

व्यवसाय नियंत्रित करण्यास इच्छुक आहेत. बऱ्याच स्त्रिया त्यांच्या मोहिमांमध्ये यशस्वी झाल्या. आणि यशस्वी उद्योजक म्हणून उभ्या झाल्या.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मते, 'जेव्हा महिला पुढे जाते तेव्हा कुटुंब चालते, गाव हलते आणि राष्ट्र पुढे जाते.' नव्या औद्योगिक धोरणनात महिलांनी स्वतःचा उपक्रम सुरू करता यावा यासाठी सरकारने खास उद्योजकीय प्रशिक्षण कार्यक्रम घेण्याची गरज यावर विशेष भर दिला आहे. वित्तीय उद्योजक आणि संस्थांनी महिला उद्योजकता मदत करण्यासाठी विशेष कक्ष स्थापित केले आहेत. त्यामुळे भारतातील उद्योजक क्रिया करण्यास महिलांना खूप मदत झाली आहे. महिला उद्योजक फक्त आपल्या उद्योग स्थापित नाही तर इतरांना नोकरी देतात. त्यांच्या उद्योजक कार्यामुळे महिला उद्योजक बाजारात गतिशीलता आणतात अशा प्रकारे देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यास मदत करतात.

महिला उद्योजकता वाढवण्यासाठी जबाबदार घटक:-

१. महिलांसाठी स्वतंत्र कायदे बनत आहेत त्यामुळे महिला उद्योजकता वाढत आहे.
२. महिलासाठी विशेषतः आवश्यक उद्योजक ते मध्ये नुकतेच जास्त सहभाग दर्शवतात.
३. सामाजिक परिस्थिती लक्षात महिला घेतात.
४. महिलांमध्ये साक्षरता आणि कौशल्य शिक्षण आले आहे.
५. महिला इंटरनेटचा वापरही मोठ्या प्रमाणात करत आहेत.
६. महिलांमध्ये मार्केटिंग आहे.
७. महिला उद्योजक अधिकाधिक यशस्वी होत आहेत.
८. महिला ह्या ग्राहकांच्या गरजा बद्दल अधिक जागरूक असतात.
९. महिलांची क्षमता त्यांना उद्योजक म्हणून उत्कृष्ट बनवते.
१०. यशस्वी होण्यासाठी उद्योजकांना आता सोशल मीडिया मध्ये व्यस्त राहावे लागते स्वभावाने स्त्रिया सामाजिक असतात सोशल मीडियाचा लाभ घेऊ शकतात.

महिला उद्योजकांच्या मार्गातील अडथळे:-

भांडवलाची **कमतरता:** महिला उद्योजकांना अगदी कच्चामाल खरेदी करणे आणि मजुरांना मजुरी देण्यासह उद्योजकांच्या दिवसादररोज होणाऱ्या अर्थ

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

पुरवठ्यात अडचणी येतात. निधीची कमतरता महिला उद्योजकांची परिस्थिती अत्यंत असुरक्षित बनवते.

उत्पादन समस्या: अयोग्य समन्वयक आणि कोणत्याही कार्याच्या अमालबजावणी उशीर झाल्यामुळे उत्पादनात समस्या उद्भवू शकतात. महिलांना सर्व उत्पादनात समन्वय व नियंत्रण ठेवणे अवघड होऊ शकते.

विपणन समस्या (माल विक्रीची समस्या) : माल विक्रीची समस्या महिला उद्योजकांच्या उत्पादनाची महत्त्वाची असते. महिला उद्योजकांकडे बदलत्या बाजाराविषयी माहिती नसते. आणि त्यांना बाजारपेठ ताब्यात घेणे आणि उत्पादनाचे लोकप्रिय करणे अवघड जाते.

सामाजिक **व सांस्कृतिक समस्या:** भारतासारख्या पारंपारिक देशामध्ये स्त्रीची प्रमुख भूमिका तिच्या कुटुंबाकडे आहे. नोकरी करणारी महिला किंवा उद्योजक म्हणून तिच्या कारकिर्दीची पर्वा न करता तिला प्रामुख्याने कौटुंबिक कर्तव्य पार पाडावे लागते. महिला उद्योजकाला दुहेरी जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. तिला आपल्या कुटुंबाचे तसेच व्यवसायाचे व्यवस्थापन करावे लागते. आज समाजात मुलीपेक्षा मुला मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देतात. याचा परिणाम स्त्रियांच्या शिक्षणाचा अभाव आणि व्यवसायिक शिक्षणात होतो. पुरुष मजुराला महिला मुजरापेंक्षा जास्त मजुरी दिली जाते. पुरुष कामगार महिलांच्या हाताखाली काम करण्यास नाखूष असतो.

आत्मविश्वासाचा **अभाव:** स्त्रिया आपल्या कुटुंबातील सदस्यावर अवलंबून आहेत. त्यांच्या कुटुंबातील पुरुषांकडून नेहमीच रक्षण व मार्गदर्शन केले गेले आहे. कोणताही निर्णय घेण्यापासून ते कुठेही जाण्यापूर्वी पुरुषांबरोबर असतात. यामुळे स्त्रियांना त्यांच्या स्वतःच्या क्षमतेवर कमी आत्मविश्वास वाटतो.

या सर्व अडथळयांना न जुमानता महिला उद्योजकांनी औद्योगिक क्षेत्रातील सर्वच क्षेत्रात स्वतःला सिद्ध केले आहे. ते काम आणि घरात त्यांची भूमिका यशस्वीपणे पार पाडत आहेत आणि त्यांचे व्यवस्थापन करीत आहेत. उद्योजकता पुरुष किंवा स्त्रीवर अवलंबून नसते. ही मनाची मनोवृत्ती आहे. जोखीम घेण्याचे आणि निर्णय घेण्याचे गुण विकसित करण्यासाठी महिला उद्योजकांना जन्मजात वातावरणा द्वारे पाठिंबा देण्याची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

१. डॉ.राशी ए.मिश्रा : महिला सबलीकरण, विकास आणि उद्योजकता योजना सप्टेंबर,२०१६

Late Ramesh Warpudkar (ACS) College
Dist. Parbhani

२. प्रा.सुधीर सेवेकर : उद्योजकता संकल्पना आणि प्रेरणा विद्या बुक्स पाब्लशर्स, औरंगाबाद

३. प्रा.प्रभाकर देशमुख : उद्योजकता विकास (संकल्पना आणि व्यवहार) पिपंळपुरे पब्लिशर्स, नागपूर

४. डॉ.जयंत जोशी : व्यवसायीक उद्योजकता, पिपंळपुरे पब्लिशर्स, नागपुर

५. प्रतिभा राजपूत :महिला उद्योजकता देशाच्या विकासाची गरज

❄❄❄❄

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

**PRINCIPAL**
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani